डोणगाव ग्रामसभेत शेतकऱ्यांच्या हिताचा मोठा निर्णय: ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी >> पान 2

शक्तिपीठ महामार्गाला हरित झेंडा; कोल्हापुरात शेतकऱ्यांचा संताप अनावर >> पान 3

गणेशोत्सव आणि ईदच्या पार्श्वभूमीवर खामगावात पोलीस रूट मार्च >> पान 4


**सुविचार**

कष्टाला कधीच पर्याय नाही.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 38 ■ शुक्रवार, दि. 29 ऑगस्ट 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





साऊथ सिनेसृष्टीत बेंबीचं फार आकर्षण, अभिनेत्री डेझी शाहने शेअर केले विचित्र अनुभव

आतील पान

# मराठवाड्यात मुसळधार, अनेक नद्यांना पूर

## लातूर, नांदेड, बीडमध्ये जनजीनवन विस्कळीत, गावांचा संपर्क तुटला

**लातूर : गणेशोत्सवाचे आगमन होताच यंदाही पावसाने हजेरी लावली असून गेल्या ४-५ दिवसांपासून उघडीप दिलेला वरुणराजा आज पुन्हा कोसळला आहे. मुंबईसह मराठवाडा आणि पश्श्चिम महाराष्ट्रातही पावसाच्या सरी बरसल्या आहेत. नांदेड जिल्ह्यात गेल्या १० दिवसांपूर्वी झालेल्या पावसाने मोठं नुकसान झालं असून लातूरमध्येही पावसाने जनजीवन विस्कळीत झाले आहे.**



लातूर जिल्ह्यात मागील सोळा तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक नद्या-नाले दुथडी भरून वाहत आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील दहापेक्षा अधिक मार्गावर वाहतूक ठप्प झाली आहे. अरुंद आणि कमी उंचीच्या पुलांवरून पाणी वाहत असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून वाहतूक बंद करण्यात आली आहे.

मराठवाड्यातील परभणी, नांदेड आणि लातूर जिल्ह्यातही आज पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे, सकाळपासून सूर्यदेवाचे दर्शन दूर राहिला. लातूर जिल्ह्यातील १० पेक्षा अधिक मार्गावर वाहतूक ठप्पा झाली असून बोरगावचा संपर्क पूर्णपणे तुटला आहे. येथील लेंडी नदीच्या पुलावरून पाणी जात असून गावातील अनेक घरांमध्ये पाणी शिरले आहे, तसेच शेतजमिनींचेही मोठे नुकसान झाले आहे.

उदगीर मुक्रमाबाद रस्त्यावरील धडकनाळ या ठिकाणच्या अरुंद कठडे नसलेल्या पुलावरून पाणी जात असल्याने वाहतुकीसाठी तो पूल बंद करण्यात आला आहे. मागील १६ तासापासून सातत्याने होत असलेल्या पावसामुळे सर्वत्र पाणीच पाणी झालं आहे. शेत शिवारात पाणी, नद्या नाले दुथडी भरून वाहत आहेत,. तसेच, अनेक गावातील सखल भागात पाणी गेल्याने जनजीवन विस्कळीत झाला आहे. लातूर जिल्ह्यातील विविध ठिकाणच्या दहा अरुंद पुलावरून पाणीही जात असल्याने ते पुल वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत.

भंडाऱ्यात आज आलेल्या मुसळधार पावसानं एका घराची भिंत कोसळली. या घटनेत एक गाय आणि चार शेळ्यांचा (बकऱ्या) मृत्यू झाला. तर एका महिलेसह एक गाय गंभीर जखमी झाली. ही घटना भंडाऱ्याच्या साकोली तालुक्यातील निलागोंदी या गावात घडली. गंभीर जखमी महिलेला तातडीनं साकोली येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं. तर ग्रामस्थ आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मदतीनं कोसळलेल्या भिंतीचा मलबा काढून मृत आणि जखमी जनावरांना त्यातून बाहेर काढून जखमी जनावरांवर उपचार करण्यात आले. वैशाली वंजारी (३५) असं गंभीर जखमी झालेल्या महिलेचं नावं आहे.

आठ ते दहा दिवसांच्या उघाडीनंतर यवतमाळ जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह जोर'धार' पावसाने हजेरी लावली आहे. आज सकाळपासून ढगाळी वातावरण होते, तर अडीच वाजताच्या सुमारास अचानक जोरधार पावसाने हजेरी लावली. पडलेला पाऊस कपाशीसाठी काहीसा फायदाचा ठरत असला तरी सोयाबीन आणि तूर या पिकांना अतिपाण्याचा फटका बसण्याची शक्यता आहे.

### मांजरा नदीचे रौद्र रूप; पाणी पात्राबाहेर

शिरूर अनंतपाळ : शिरूर अनंतपाळ तालुक्यातील मौजे उजेड आणि परिसरातील शिवारात मांजरा नदीचे रौद्र रूप पाहण्यास मिळत आहे. नदीपात्राबाहेर पाणी शेत शिवारातून वाहात आहे. मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले दिसून येते आहे. सततच्या होणा-या पावसाने मांजरा नदीने रौद्र रूप धारण केले आहे. नदीचे पाणी पात्राच्या बाहेर पडले आहे. नदीकाठच्या शेतातील सोयाबीन, मूग पिकामधून पाणी वाहत आहे. सद्यस्थिती पाहता यापेक्षाही प्रचंड पाणी पातळीत वाढ होण्याची शक्यता आहे . त्यामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे. शेतीचे मोठे नुकसान झालेले दिसुन येते आहे.



## चिखलीत पोलिसांची कारवाई : अवैध वाळू वाहतूक करणारे दोन टिप्पर जप्त

**बुलढाणा/प्रतिनिधी:** जिल्ह्यात अवैध वाळू वाहतुकीवर अंकुश ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनाने कारवाईची मोहिम राबवली आहे. पोलीस अधीक्षक निलेश तांबे आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली, चिखली परिसरात अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात आली.

२८ ऑगस्ट रोजी मलगी फाट्याजवळ गस्त घालत असलेल्या पथकाला दोन ट्रकमधून परवाना नसताना वाळू वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळाली. सदर माहितीच्या आधारे पोलिसांनी नाकेबंदी करत दोन्ही वाहनांची तपासणी केली असता, अंदाजे ८ ब्रास वाळू सापडली. सदर वाळूची अंदाजित किंमत सुमारे ८०,००० रुपये इतकी असून, दोन्ही ट्रक आणि वाळू मिळून सुमारे ५० लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३०३ (२) बीएनएस तसेच गौणखनिज (विनियमन) अधिनियमाच्या कलम २१(१) आणि २१(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही यशस्वी कारवाई एएसआय राजकुमार राजपूत, पोलीस कर्मचारी ओमप्रकाश सावळे, गजानन दराडे, जगदेव टेकाळे, दिगंबर कपाटे, वनिता शिंगणे आणि दीपक वायाळ यांच्या पथकाने संयुक्तपणे केली.




## मनोज जरांगे मुंबईकडे कूच करण्यावर ठाम

**मुंबई/प्रतिनिधी:** मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील आज मुंबईच्या दिशेने रवाना होत आहेत. ते आज रात्री उशिरापर्यंत आझाद मैदानावर पोहोचण्याची शक्यता आहे. न्यायालयाने त्यांना आझाद मैदानावर आंदोलन करण्यास परवानगी नाकारली असली, तरी पोलिसांनी काही अटींसह केवळ एका दिवसासाठी आंदोलन करण्याची मुभा दिली आहे. तथापि, मनोज जरांगे पाटील मात्र बेमुदत आंदोलन करण्याच्या आपल्या भूमिकेवर ठाम असल्याचे स्पष्ट करत आहेत. आता या पार्श्वभूमीवर सरकारने सावध भूमिका घेतल्याचे बघायला मिळतंय.

# डोणगाव ते आरेगाव रस्ता रखडल्याने नागरिकांत संताप; राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा आक्रमक इशारा

## अधिकारी गैरहजर, खुर्चीला दिलं निवेदन

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी:** बुलढाणा जिल्ह्यातील डोणगाव ते आरेगाव जोडणारा महत्त्वाचा मार्ग गेल्या अनेक महिन्यांपासून रखडलेला असून त्यामुळे या भागातील नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्याचे काम सुरू होऊन वर्षानुवर्षे उलटली तरीही अद्याप काम पूर्ण झालेले नाही. या रखडलेल्या कामा विरोधात राष्ट्रवादी युवक काँग्रेसने आक्रमक भूमिका घेतली आहे.

आज राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे आणि महाराष्ट्र प्रदेश सचिव पंकज पळसकर विजय सरकटे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात जाऊन निवेदन देत प्रशासनाला जागं करण्याचा प्रयत्न केला. मात्र संबंधित अधिकारी अनुपस्थित असल्याने संतप्त कार्यकर्त्यांनी थेट त्यांच्या खुर्चीला निवेदन अर्पण करून आंदोलनाचा इशारा दिला. यामुळे कार्यालयात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.




गेल्या कित्येक महिन्यांपासून हा मार्ग रखडल्यामुळे पावसाळ्यात दलदलीसारखी परिस्थिती निर्माण होते, तर उन्हाळ्यात प्रचंड धूळ उडते. रुग्णवाहिका, शालेय बस, दैनंदिन वाहतूक यावर याचा गंभीर परिणाम होत आहे. नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण असून, वारंवार मागणी करूनही कामास गती न मिळाल्यामुळे प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे.



या वेळी बोलताना जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांनी सांगितले की, ''आम्ही वेळोवेळी या रस्त्याबाबत पाठपुरावा केला आहे. मात्र प्रशासन झोपेत आहे की काय, अशी परिस्थिती आहे. जर लवकरात लवकर हा रस्ता पूर्ण न झाला, तर आम्हाला रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्याशिवाय पर्याय राहणार नाही.''

प्रदेश सचिव पंकज पळसकर यांनीही संताप व्यक्त करत सांगितले की, ''हा रस्ता केवळ दोन गावांचा नाही, तर संपूर्ण तालुक्याच्या दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. जनतेच्या संयमाची परीक्षा पाहू नये, अन्यथा तीव्र आंदोलन होईल.''

सदर रस्त्याचे काम अर्धवट अवस्थेत असून, त्या ठिकाणी सुरक्षेची कुठलीही व्यवस्था नाही. त्यामुळे अपघातांची शक्यता अधिक आहे. यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने ठोस पावले उचलून काम तात्काळ पूर्ण करावे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

### रस्ता पूर्ण कधी होणार?

सदर रस्त्याचे काम नेमके कोणत्या कारणांमुळे रखडले आहे, याबाबत अजूनही स्पष्टता नाही. निधीअभावी की प्रशासनाच्या उदासीनतेमुळे हे काम रखडले, हे समजण्यास मार्ग नाही. मात्र, या प्रश्नाचे उत्तर आता संबंधित अधिकाऱ्यांनी देणे गरजेचे ठरत आहे.

## हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद

आज २९ ऑगस्ट, राष्ट्रीय क्रीडा दिन. हॉकीचे महान खेळाडू मेजर ध्यानचंद या महान खेळाडूचा गौरव म्हणून हा दिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. या दिवशी राष्ट्रपतींच्या हस्ते खेळाडूंना खेलरत्न पुरस्कार, अर्जुन पुरस्कार आणि द्रोणाचार्य पुरस्कारांचे वितरण केले जाते. शिवाय खेळातील सर्वोच्च जीवनगौरव पुरस्कार म्हणून २००२ पासून मेजर ध्यानचंद पुरस्कार देण्यात येतो. आपल्या कारकिर्दीत खेळात असामान्य कर्तृत्व दाखवणाऱ्या आणि निवृत्तीनंतरही त्या खेळासाठी जीवन वेचणाऱ्या क्रीडापटूला मेजर ध्यानचंद जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खेलरत्न पुरस्काराला देखील मेजर ध्यानचंद यांचे नाव देऊन मेजर ध्यानचंद यांच्या कार्याचा यथोचित असा गौरव केला आहे. ज्या खेळाडूंनी वर्षभर सर्वोत्तम कामगिरी करून जागतिक पातळीवर देशाचे नाव उज्वल केले आहे अशा खेळाडूंना हा पुरस्कार दिला जातो. हा पुरस्कार क्रिडा क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार समजला जातो. २९ ऑगस्ट १९०५ रोजी उत्तरप्रदेश मधील अलाहाबाद येथे मेजर ध्यानचंद यांचा जन्म झाला. त्यांचे वडील सोमेश्वर दत्त हे आर्मीमध्ये असल्याने त्यांच्या वारंवार बदल्या होत. वडिलांच्या निवृत्तीनंतर १९२२ मध्ये वयाच्या सोळाव्या वर्षी ते स्वतः आर्मीत दाखल झाले. त्यावेळी ते आर्मीच्या रेजिमेंटमध्ये होणाऱ्या हॉकी सामन्यात खेळत असे. हॉकीतील त्यांचे कौशल्य पाहून मेजर बाले तिवारी यांनी त्यांना हॉकीमधील बारकावे शिकवले. ते त्यांचे हॉकीमधील गुरू होते. पुढे मेजर ध्यानचंद हॉकीमध्ये इतके रमले की हॉकी हाच त्यांचा जीव की प्राण ठरला. १९२२ ते १९२६ या कालावधीत त्यांनी रेजिमेंटच्या विविध स्पर्धांमध्ये आपले कौशल्य दाखवले. हॉकीतील त्यांच्या कर्तुत्वामुळे न्यूझीलंड दौऱ्यावर जाणाऱ्या इंडियन आर्मी संघात त्यांची निवड झाली. हा दौरा त्यांनी गाजवला. या दौऱ्यात त्यांनी आपल्या संघाला १८ विजय मिळवून दिले. दोन लढती बरोबरीत सुटल्या तर केवळ एका लढतीत पराभव स्वीकारला. हा दौरा त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरला. या दौऱ्याने त्यांना जगभर नाव मिळवून दिले. या दौऱ्यानंतर त्यांना लान्स नायक म्हणून बढती मिळाली. केवळ भारतातीलच नाही तर जगभरातील दिग्गज खेळाडू त्यांच्या खेळाच्या प्रेमात पडले. मेजर ध्यानचंद यांचे हॉकी खेळण्याचे कौशल्य अफलातून होते. चेंडूवरचे नियंत्रण ही त्यांची खासियत होती. चेंडू त्यांच्या ताब्यात असताना, मैदानात कोणी खेळत नाही असेच वाटायचे. चेंडू त्यांच्या स्टीक जवळून हलतच नसे म्हणून त्यांच्या स्टिकमध्ये चुंबक बसवला आहे अशी अफवा तेंव्हा पसरली होती. हॉकी हा सांघिक खेळ आहे तो संघ भावनेनेच खेळला पाहिजे असे त्यांचे मत होते म्हणूनच चेंडूवर अफलातून नियंत्रण असूनही ते आपल्या सहकाऱ्यांना अचूक पास द्यायचे. हॉकीतील त्यांच्या या कौशल्यामुळेच त्यांना हॉकीचे जादूगार असे म्हटले जाते. मेजर ध्यानचंद यांनी आपल्या जादुई खेळाने देशाला १९२८ ( एमस्टरडॅम ) १९३१ ( लॉस अँजेलीस ) १९३६ ( बर्लिन ) अशा सलग तीन ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये सुवर्णपदक जिंकून दिले होते. १९३६ मधील भारत जर्मनी यांच्यात झालेल्या ऑलिम्पिकच्या अंतिम लढतीत ध्यानचंद यांनी एकहाती विजय मिळवून दिला होता. ही लढत पाहायला जर्मनीचे हुकूमशहा एडॉल्फ हिटलर उपस्थित होते. ध्यानचंद यांच्या खेळाने ते चांगलेच प्रभावित झाले. ध्यानचंद यांच्या हॉकीतील कौशल्याने जर्मनीचा हुकूमशहा एडॉल्फ हिटलर यांनाही वेड लावले होते. त्यांच्या असामान्य कौशल्याने भारावलेल्या हिटलर यांनी त्यांना जर्मन नागरिकत्व देण्याची तसेच इंग्लिश इंडियन आर्मीत मेजरपद व कर्नल पदापर्यंत बढती देण्याचीही ऑफर दिली होती ; पण देशप्रेमी आणि स्वाभिमानी ध्यानचंद यांनी ती नम्रपणे नाकारली होती. लॉस अँजेलीस मध्ये खेळलेल्या भारतीय संघाचे वर्णन एका अमेरिकन पत्रकाराने पूर्वेकडील वादळ असे केले होते. ध्यानचंद १९५६ मध्ये निवृत्त झाले. त्याचवर्षी भारत सरकारने त्यांना पद्मभूषण देऊन गौरवले. निवृत्तीनंतर पटियाला येथील क्रीडा संस्थेत मुख्य प्रशिक्षक म्हणून त्यांनी तरुण खेळाडूंना प्रशिक्षण दिले. ३ डिसेंबर १९७९ रोजी या महान खेळाडूचे निधन झाले. भारताला सुवर्णयुगाची अनुभूती देणाऱ्या या महान हॉकीच्या जादूगाराला मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने गौरवावे अशीच तमाम भारतीय क्रीडा रसिकांची इच्छा आहे. हॉकीचे जादुगर मेजर ध्यानचंद यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन !

# डोणगाव ग्रामसभेत शेतकऱ्यांच्या हिताचा मोठा निर्णय: ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी

## कचरा फेकणाऱ्यांवर गुन्हे दाखल होणार

**दैनिक आपला विदर्भ**





**डोणगाव/प्रतिनिधी:** जिल्ह्यातील लोकसंख्येच्या तुलनेत सर्वात मोठी आणि महत्त्वाची मानली जाणारी डोणगाव ग्रामपंचायतची ग्रामसभा नुकतीच पार पडली. या ग्रामसभेत अनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले असून शेतकऱ्यांच्या हितासाठी महत्त्वाचा ठराव संमत करण्यात आला. जून महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे डोणगाव परिसरातील शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांची पीक पूर्णपणे नष्ट झाली, तर काहींना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतने ओला दुष्काळ जाहीर करण्याची जोरदार मागणी केली असून, यासंबंधीचा ठराव संमत करून जिल्हाधिकारी मार्फत तो राज्य शासन आणि थेट मुख्यमंत्र्यांकडे पाठवण्यात येणार आहे. सरपंच चरण आखाडे यांनी ही माहिती ग्रामसभेत दिली. त्यांनी स्पष्ट केलं की, ''शेतकरी सध्या अडचणीत अडकला असून, शासनाने तात्काळ मदतीची घोषणा केली पाहिजे. म्हणूनच आम्ही ओल्या दुष्काळाची अधिकृत मागणी करत आहोत.''

दरम्यान, गावातील स्वच्छता व आरोग्याच्या दृष्टीने देखील ग्रामसभेत कडक पावलं उचलण्यात आली आहेत. सरपंचांनी सांगितले की, ''गावातील काही नागरिक रस्त्यावर कचरा टाकत असून त्यामुळे गावाचे आरोग्य धोक्यात येत आहे. आता यापुढे असे प्रकार सहन केले जाणार नाहीत.'' ग्रामपंचायतीच्या वतीने रस्त्यावर कचरा फेकणाऱ्या व्यक्तींवर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु केली जाईल, असेही ते म्हणाले.

या ग्रामसभेत ग्रामपंचायत सदस्य, विविध विभागांचे अधिकारी, शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी ग्रामपंचायतीने घेतलेले निर्णय निश्चितच सकारात्मक दिशेने पाऊल असल्याचे उपस्थित ग्रामस्थांनी नमूद केले.

राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोपाल आखाडे यांनी ग्रामसभेत मनोगत व्यक्त करताना शेतकऱ्यांच्या संकटाची जाणीव व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, ''शेतकरी अन्नदाता असून, त्यांनी निसर्गाशी झुंज देत आपला संसार चालवतो. मात्र यंदा झालेल्या अतिवृष्टीमुळे त्यांची अक्षरशः होरपळ झाली आहे.'' त्यांनी पुढे ग्रामपंचायतीकडे विनंती करत 'ओला दुष्काळ' जाहीर करण्यासाठी ठराव घ्यावा, अशी मागणी केली होती. ही मागणी ग्रामसभेत मान्य करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर सरपंच चरण आखाडे यांनी ग्रामसभेतच आक्रमक भूमिका घेत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना जाब विचारला. त्यांनी ठणकावून सांगितले की, ''ग्रामसभा ही गावाच्या हक्काची संसद आहे. येथे हजेरी लावणे ही केवळ कायदेशीर जबाबदारी नाही, तर गावकऱ्यांप्रती असलेली नैतिक जबाबदारीही आहे. जी अधिकारी याकडे दुर्लक्ष करतील, त्यांच्यावर ग्रामसभेच्या माध्यमातून तातडीने कारवाई केली जाईल.''

ग्रामसभेतील हा इशारा केवळ वक्तव्यापुरता मर्यादित राहणार नसून, ग्रामपंचायतीने यासंबंधी अधिकृत तक्रार व नोंदी घेण्याची प्रक्रियाही सुरू करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. डोणगाव ग्रामपंचायतीने गावच्या हितासाठी केलेल्या या ठाम भूमिकेमुळे भविष्यात अधिकारी वर्ग अधिक जबाबदारीने उपस्थित राहील, अशी अपेक्षा गावकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे.

### ग्रामसभेला अधिकाऱ्यांची दांडी: सरपंचांचा आक्रमक इशारा

डोणगाव ग्रामसभेत शेतकऱ्यांच्या हिताचे आणि ग्रामविकासासाठी महत्त्वाचे निर्णय घेतले जात असताना, काही विभागीय अधिकाऱ्यांनी ग्रामसभेला उपस्थित राहणे टाळले, हे विशेषतः खटकणारे ठरले. गावकऱ्यांच्या अडचणी, शेतकऱ्यांची होरपळ, सार्वजनिक आरोग्याचे प्रश्न अशा गंभीर विषयांवर चर्चा सुरू असतानाही संबंधित अधिकाऱ्यांची अनुपस्थिती ही प्रशासनाच्या दुटप्पी भूमिकेचे निदर्शक असल्याचे स्पष्ट दिसून आले.

# दारूबंदीसाठी महिलांचा एल्गार प्रभाग १४ मध्ये अवैध दारू विक्रीला आळा घालण्याची मागणी

**दैनिक आपला विदर्भ**



**शेगाव/प्रतिनिधी:** शेगाव शहरातील प्रभाग क्रमांक १४ मध्ये तीन पुतळा परिसर, इंदिरा नगर, मिलिंद नगर, भीम नगर आणि दसरा नगर या भागांमध्ये अवैध दारू विक्री व इतर बेकायदेशीर व्यवसाय बोकाळले असून, त्यामुळे स्थानिक नागरिकांच्या जीवनात त्रासदायक परिस्थिती निर्माण झाली आहे. विशेषतः महिलांचे जीवन असुरक्षित झाले असून घरातल्याच तरुण पिढीचे भवितव्य अंधकारमय होत असल्याने नागरिकांनी आवाज उठवला आहे.

याच पार्श्वभूमीवर आज गुरुवार दिनांक २८ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता, प्रभागातील शेकडो महिलांनी शेगाव शहर पोलीस स्टेशनला धडक दिली. त्यांनी पोलिस ठाण्यात ठिय्या देत जोरदार घोषणाबाजी करत कारवाईची मागणी केली. महिलांचा रोष पाहता पोलिसांनी लगेचच उपस्थिती वाढवून महिलांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

**''दारू हटवा, वाचवा पिढ्या!'' महिलांची तीव्र भावना**

या आंदोलनात अनेक स्थानिक महिलांनी आपली व्यथा मांडली. त्यांच्या म्हणण्यानुसार, ''घराशेजारीच दारूची विक्री चालते. लहान मुले, तरुण यांचे आयुष्य बरबाद होत आहे. पोलिसांनी कारवाई केलीच पाहिजे.''

**पोलीस ठाणेदार नितीन पाटील यांची प्रतिक्रिया**

या वेळी उपस्थित ठाणेदार नितीन पाटील यांनी नागरिकांना आश्वस्त करत सांगितले की, ''आम्ही आतापर्यंत देखील अनेक वेळा कारवाई केली आहे. मात्र आता या मागणीनुसार आणखी कडक आणि सातत्यपूर्ण कारवाई केली जाईल. तुमच्या सहकार्यानेच हे पूर्ण शक्य आहे.''

त्यांनी या भागातील आधी केलेल्या छाप्यांचा आणि गुन्हे नोंदवण्याचा आढावा देखील आंदोलनकर्त्यांसमोर ठेवला.

**वंचित बहुजन आघाडीचे पाठबळ**

या आंदोलनाला वंचित बहुजन आघाडीचे स्थानिक नेते राजेंद्र शेगोकार यांनी देखील पाठिंबा दिला. त्यांनी म्हटले की, ''या भागातील दारूबंदी हे केवळ कायद्याचं नव्हे, तर सामाजिक प्रश्न आहे. पोलिसांनी जर कारवाई केली नाही, तर पुढील आंदोलन अधिक तीव्र होईल.''

दारूच्या विळख्यात अडकलेल्या भागात महिलांनी पुढाकार घेऊन थेट पोलिस ठाण्याच्या दारात ठिय्या आंदोलन केल्याने प्रशासनाला जाग आली आहे. यापुढे शेगाव पोलीस नेमकी कितपत कारवाई करतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### साऊथ सिनेसृष्टीत बेंबीचं फार आकर्षण, अभिनेत्री डेझी शाहने शेअर केले विचित्र अनुभव

**मुंबई/प्रतिनिधी:** अभिनेत्री डेझी शाह हिने सलमान खानसोबत जय हो या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले होते. तिने कन्नड चित्रपटसृष्टीतही काम केले आहे. अलीकडेच हॉटरफ्लाय या मुलाखतीत डेझीने कन्नड चित्रपटसृष्टीतील अभिनेत्रींच्या बेंबीबाबतच्या आकर्षणाबद्दल खुलासा केला.

डेझी शाहने आठवले की जेव्हा ती एका कन्नड चित्रपटावर काम करत होती, तेव्हा तिला फक्त एखाद्या सीनमध्ये कोणते एक्सप्रेशन द्यायचे ते सांगितले जात असे, तर पुरुष अभिनेत्यांना त्यांच्या भूमिकेचे पूर्ण पार्श्वभूमी कथानक व उपकथानकासह मार्गदर्शन दिले जात असे. तिने याचे कारण आपले त्या भाषेवर प्रभुत्व नसणे हे सांगितले.

डेझीने पुढे सांगितले की या कन्नड चित्रपटसृष्टीत अभिनेत्रींच्या बेंबीचं आकर्षण अजूनही टिकून आहे. तिने सांगितले, ''जेव्हा मी कन्नड चित्रपट करत होते, तेव्हा सुट्टीच्या दिवशी मी टीव्ही पाहायचे. मला दिसले की, कन्नड गाण्यांमध्ये एका विशिष्ट अभिनेत्याच्या सर्व गाण्यांत नायिकेच्या बेंबीवर फळांचा सॅलड किंवा भाज्यांचा सॅलड तयार केला जात असे. कधी कधी बेंबीवर बर्फ किंवा पाणी ओतले जात असे.''

# पतीकडून पत्नीचा संशयावरून अमानुष खून रॉकेल टाकून पेटवले

**दैनिक आपला विदर्भ**





**नवी मुंबई/प्रतिनिधी:** उरण तालुक्यातील पागोटे गावात एक धक्कादायक आणि क्रूर घटना समोर आली आहे. पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत, पतीने तिचा गळा दाबून खून केला आणि नंतर तिच्या अंगावर रॉकेल टाकून तीला जाळून टाकले. ही घटना २५ ऑगस्टच्या रात्री घडली असून, संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

घटनेचा तपशील:

राजकुमार साहू (वय ३५), मूळचा उत्तर प्रदेशातील असून, तो मागील काही वर्षांपासून उरणमधील पागोटे गावात वास्तव्यास होता. पेशाने ट्रक चालक असलेल्या राजकुमारला आपल्या पत्नीवर दुसऱ्या पुरुषासोबत अनैतिक संबंध असल्याचा संशय होता.

या संशयातून त्याने अत्यंत क्रूर पद्धतीने पत्नीचा खून केला. २५ ऑगस्टच्या रात्री, पत्नी झोपेत असताना, राजकुमारने आधी तिचा गळा दाबून खून केला, त्यानंतर तिच्या अंगावर रॉकेल ओतून तिला पेटवून दिले.

घटनास्थळी त्यांची सात वर्षांची मुलगी देखील उपस्थित होती. खून केल्यानंतर राजकुमार त्या चिमुकलीला घेऊन घरातून फरार झाला.

पोलिसांची तत्पर कारवाई:

सकाळी शेजाऱ्यांनी आगीचा व मृतदेहाचा सुगावा लागल्यावर लगेच पोलिसांना माहिती देण्यात आली. उरण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत, जळालेल्या अवस्थेतील मृतदेह ताब्यात घेतला.

तत्काळ तपास सुरू करताच पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फूटेज आणि तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपी राजकुमार साहूला उलवे परिसरातून अटक केली. त्याच्यासोबत असलेल्या सात वर्षीय मुलीकडून चौकशी केल्यावर संपूर्ण प्रकार उघड झाला.

पोलिसांचे वक्तव्य:

सहायक पोलिस आयुक्त किशोर गायके यांनी सांगितले: ''आरोपीने पत्नीवर संशयातून तिचा खून केल्याची कबुली दिली आहे. त्याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. मुलीची सायकोलॉजिकल केअर घेतली जात आहे.

सामाजिक प्रश्नांकडे लक्ष:

ही घटना फक्त एक गुन्हा न राहता, समाजातील संशय, संवादाचा अभाव आणि मानसिक आरोग्याच्या प्रश्नांकडे लक्ष वेधते. संशय आणि रागाच्या भरात एका व्यक्तीचे संपूर्ण आयुष्य उध्वस्त होऊ शकते, याचे हे भयंकर उदाहरण आहे.

सध्याची स्थिती:

आरोपी राजकुमार साहू पोलिस कोठडीत आहे.

मृत महिलेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी रवाना करण्यात आला आहे.

सात वर्षांच्या मुलीची जबाबदारी सध्या चाइल्ड वेलफेअर कमिटीकडे देण्यात आली आहे.

पुढील तपासासाठी पोलिस सीसीटीव्ही फूटेज, शेजाऱ्यांचे जबाब आणि फोन कॉल डिटेल्स तपासत आहेत.

निष्कर्ष:

नवी मुंबईतील ही घटना नात्यांतील विसंवाद किती विकृत वळण घेऊ शकतो याचे भीषण उदाहरण आहे. पोलिस याप्रकरणाचा अधिक तपास करत असून आरोपीवर कठोर कारवाई होण्याची शक्यता आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### सर्वतीर्थ टाकेद येथे अपघात, दर्शनासाठी आलेल्या महिलांचा पिकअप उलटला १२ महिला जखमी



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी:** नाशिक जिल्ह्यातील सर्वतीर्थ टाकेद येथे एक गंभीर अपघात घडला आहे. ऋषिपंचमीच्या निमित्ताने मालेगाव येथून दर्शन व स्नानासाठी आलेल्या महिलांचा पिकअप वाहन रस्त्यावरील चिखलामुळे घसरून रस्त्याच्या खाली पलटी झाला.

या अपघातात १० ते १२ महिला जखमी झाल्या असून, त्यांना तातडीने सर्वतीर्थ टाकेद येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. प्राथमिक माहितीनुसार, वाहन रस्त्यावरून घसरल्यामुळेच हा अपघात झाला. सुदैवाने जीवितहानी झाली नाही, मात्र काही महिलांना गंभीर दुखापती झाल्याची माहिती आहे. अपघातानंतर परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. अधिक तपशील आणि चौकशी पोलीस प्रशासनाद्वारे सुरू आहे.

### प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना; ई-केवायसी, आधार सीडिंग करा- कृषी विभागाचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ मिळणाऱ्या शेतकऱ्यांपैकी २ हजार ७७९ शेतकऱ्यांची ई केवायसी आणि ४ हजार २५३ शेतकऱ्यांचे आधार सीडिंग प्रलंबित आहे. शेतकऱ्यांनी प्रलंबित ई केवायसी, आधार सीडिंग व बँक खात्याला डिबीटी इनेबल करणे किंवा इंडिया पोस्ट पेमेंट बँक मध्ये खाते उघडून त्या खात्याला आधार संलग्न करून डिबीटी इनेबल करण्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाचे तंत्र अधिकारी समृद्धी वांगसकर यांनी केले आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेसाठी केंद्र आणि शासनाकडून वार्षिक प्रत्येकी सहा हजार आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेमार्फत वार्षिक प्रत्येकी सहा हजार रुपये शेतकरी कुटुंबांना दिले जात आहेत. त्यासाठी ई-केवायसी आणि आधार सीडींग करणे अत्यावश्यक आहे, नसल्यास शेतकरी लाभापासून वंचित राहतील. त्यासाठी शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषि कार्यालय व तालुक्यातील कृषी सहाय्यक किंवा गाव नोडल अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा म्हणजे लाभापासून कोणीही वंचित राहणार नाही, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

### प्रतिबंधात्मक नोटीस झुगारली; गणेश मिरवणुकीत सहभागी झालेल्या ८ जणांवर गुन्हे दाखल

**उमरखेड/प्रतिनिधी:** ढाणकी शहरात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात असताना, काही नागरिकांनी पोलिसांच्या सूचनांकडे दुर्लक्ष करत मिरवणुकीत सहभाग घेतल्यामुळे त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सार्वजनिक शांतता अबाधित ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनाने दिलेल्या प्रतिबंधात्मक आदेशांची पायमल्ली केल्याप्रकरणी आठ जणांवर भारतीय न्याय संहिता कलम २२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरवर्षीप्रमाणे ढाणकीत गणेशोत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा होत असून, घराघरांत आणि सार्वजनिक मंडळांमध्ये गणपती बाप्पाची प्रतिष्ठापना केली जाते. मात्र मागील वर्षी विसर्जन मिरवणुकीदरम्यान निर्माण झालेल्या वादामुळे पोलिस प्रशासनाने यंदा अधिक दक्षता घेतली होती.

शांतता राखण्यासाठी ढाणकीतील पूर्वी गुन्हे दाखल असलेल्या ७८ व्यक्तींना मिरवणुकीत सहभागी न होण्याचे आदेश देत, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६३ अंतर्गत प्रतिबंधात्मक नोटीसा बजावण्यात आल्या होत्या.

तथापि, २७ ऑगस्ट २०२५ रोजी गणेश स्थापनेच्या मिरवणुकीदरम्यान आठ जणांनी या आदेशाला धाब्यावर बसवत मिरवणुकीत सहभाग घेतल्यामुळे त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती ठाणेदार पांडुरंग शिंदे यांनी दिली.

पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, आगामी विसर्जन मिरवणुकीतही अशाच प्रकारे प्रतिबंधात्मक आदेश झुगारणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल.

गणेश मिरवणुकीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस निरीक्षक संतोष मनवर, ठाणेदार पांडुरंग शिंदे, पोलीस उपनिरीक्षक सागर अन्नमावर, बिट जमादार मोहन चाटे, रवी गीते, रोशन सरनाईक, तसेच पोलीस शिपाई प्रकाश मुंडे, शरद चव्हाण व इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# शक्तिपीठ महामार्गाला हरित झेंडा; कोल्हापुरात शेतकऱ्यांचा संताप अनावर

## सुपीक जमिनीवर गदा नकोच, आंदोलनाची चेतावणी; संघर्ष समिती ठाम

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर /प्रतिनिधी:** राज्य सरकारने कोट्यवधी खर्चाच्या 'शक्तिपीठ महामार्ग' प्रकल्पाला मंजुरी दिल्यानंतर कोल्हापुरात संतापाची लाट उसळली आहे. जरी नवीन शासन निर्णयात कोल्हापूर जिल्ह्यासाठी पर्यायी मार्गाचा विचार करण्याचा उल्लेख करण्यात आला असला, तरीही शेतकरी या संपूर्ण प्रकल्पालाच जोरदार विरोध करत आहेत. सुपीक जमिनींवर होणारा अतिक्रमणाचा धोका पाहता, "महामार्ग कोणत्याही परिस्थितीत होऊ देणार नाही," असा ठाम इशारा शेतकऱ्यांकडून देण्यात आला आहे.

या महामार्गामुळे नागपूर ते गोवा हा प्रवास सुलभ होईल, असा सरकारचा दावा आहे. मात्र, यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील कृषिप्रधान परिसरात थेट परिणाम होणार असून, अनेक गावांतील शेतकऱ्यांची जमिन बळकावली जाण्याची भीती आहे.

संघर्ष उभा राहणारच गिरीश फोंडे शक्तिपीठ महामार्ग संघर्ष समितीचे समन्वयक गिरीश फोंडे म्हणाले, "शेतकऱ्यांच्या जमिनीवरून जाणारा कोणताही महामार्ग मान्य नाही. शासन कितीही आदेश काढो, आम्ही रस्त्यावर उतरणार आणि या प्रकल्पाला रोखणार."

"हा टॅन्क आहे, महामार्ग नव्हे" राजू शेट्टी यांची टीका माजी खासदार आणि शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनीही या निर्णयावर कडाडून टीका केली. "हा महामार्ग नव्हे, तर शेतकऱ्यांच्या उरावरून जाणारा टॅन्क आहे.

सरकारने लोकांचा विरोध लक्षात घेऊन निर्णय मागे घ्यावा," अशी त्यांनी मागणी केली.




## ठाण्यातील चिमुकल्याची कमाल! महाराष्ट्रातील १२ जागतिक वारसास्थळ किल्ल्यांचा अनोखा देखावा सादर

**ठाणे/प्रतिनिधी:** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विविध देखावे साकारले जात असतानाच ठाण्यातील एका लहानग्याने सादर केलेला देखावा विशेष लक्ष वेधून घेत आहे. कार्तिक निलेश मंडलिक या शाळकरी मुलाने महाराष्ट्रातील जागतिक वारसा यादीत समाविष्ट झालेल्या १२ किल्ल्यांचा देखावा साकारला असून, त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मात्र हा केवळ देखावा नसून, प्रत्येक किल्ल्याची इतिहासाशी नाळ जोडणारी माहिती या मॉडेलमध्ये दिली आहे. देखाव्याची रचना करताना कार्तिकने विविध साहित्याचा वापर करत ५ ते ६ दिवस मेहनत घेतली. लहान वयातही इतक्या अभ्यासपूर्वक आणि कलात्मक पद्धतीने साकारलेला हा देखावा पाहणाऱ्यांना थक्क करतोय.

कार्तिक निलेश मंडलिक म्हणतो, "माझा उद्देश गणपती बाप्पाला खूश करणं तर आहेच, पण लोकांना आपल्या ऐतिहासिक किल्ल्यांबद्दल जागरूक करणं हाही आहे. महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वैभवाची साक्ष देणारा हा देखावा गणेशभक्तांसोबतच



इतिहासप्रेमींनाही आकर्षित करत आहे. अशा उपक्रमांतून लहानग्यांमध्येही संस्कृती आणि वारशाबद्दल प्रेम रुजताना दिसत आहे. कार्तिकचा देखावा पाहण्यासाठी ठाण्यातील स्थानिक मंडपात मोठी गर्दी उसळत आहे.

### बुलढाण्यातील उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळ निवडीसाठी नवी जिल्हास्तरीय समिती गठित

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या शासन निर्णय दि. २० जून २०२५ अन्वये यावर्षी उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासंदर्भात जिल्हास्तरीय समितीची नेमणूक करण्यात आली होती. मात्र, ते आदेश रद्द करून आता नवीन समिती गठित करण्यात आली आहे.

नवीन समितीचे अध्यक्ष निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार हे असतील. या समितीमध्ये सदस्य म्हणून पोलिस उप अधिक्षक बाळकृष्ण पावरा, जिल्हा आरोग्य अधिकारी अमोल गीते, जिजामाता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश गवई, जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड, जिजामाता महाविद्यालयाचे संगीत शिक्षक प्रा. गजानन लोहाटे, शिल्पकला विभागाचे डॉ. विकास पहुरकर यांचा समावेश करण्यात आला आहे. तर जिल्हा नियोजन अधिकारी राहुल पवार हे या समितीचे सदस्य सचिव राहणार आहेत.

समितीची कार्ये : जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधून प्राप्त झालेले परीक्षण अहवाल, छायाचित्रे, चलचित्र व कागदपत्रांच्या आधारे शासन निर्णय दि. २० ऑगस्ट २०२५ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार गुणांकन करणे व प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या मंडळांची निवड करून जिल्हाधिकाऱ्यांकडे शिफारस करणे. गणेशोत्सव मंडळांना उत्सवस्थळी प्रत्यक्ष भेट देऊन परीक्षण करणे. शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करणे हे या समितीचे कार्य असणार आहे.

या समितीच्या निवडीवरून यावर्षीच्या बुलढाणा जिल्ह्यातील उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांची अंतिम यादी निश्चित केली जाणार आहे.

## उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची युती म्हणजे फुसका बार - केंद्रीय मंत्री रामदास आठवले

**सातारा/प्रतिनिधी:** आठवले गटाच्या सक्षमीकरणासाठी महाबळेश्वर येथे राज्यस्तरीय विचार मंथन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी उपस्थिती लावली. या शिबिरात पक्ष वाढीच्या अनुषंगाने मंत्री आठवले यांनी च्या राज्यातून आलेल्या पदाधिकाऱ्यांना सूचना केल्या. या बरोबरच महायुती मधून या पुढील काळात होणाऱ्या निवडणुकीमध्ये जास्तीत जास्त आरपीआय पक्षाला महामंडळ आणि मंत्रिपदे मिळतील, असा ठराव घेण्यात आला. दरम्यान यावेळी मंत्री रामदास आठवले यांनी मराठा आरक्षणाबाबत मनोज जरागेंचा आंदोलनाबाबत



या विचारमंथन शिबिरात ठराव मंजूर झाल्या असल्याचे सांगत आपली प्रतिक्रिया दिली आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळाल पाहिजे, ही आमची पहिल्यापासून भूमिका आहे. मात्र मनोज जरांगे पाटील यांची मागणी आहे की, सर्व मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्या. सर्व मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देणे शक्य नाही. मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसी समाजावर अन्याय नको, अशी आमची भूमिका आहे. एखादी बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत मनोज जरांगे यांनी घ्यावी. आणि देवेंद्र फडणवीस यांच्यावरील टीका टाळावी. असा सल्ला मनोज जरांगे पाटील यांना दिला आहे. उद्धव आणि राज ठाकरे यांच्या युतीचा आमच्यावर कोणताही परिणाम होणार नाही. उलट त्यांच्या एकत्र येण्याने आम्हाला फायदा होणार आहे. मराठीच्या मुद्द्यावर हे दोघे एकत्र आले आहेत. या मराठी मतांमध्ये सुद्धा २० ते २२ टक्के मतं आमच्या बाजूने आहेत. हे दोघे एकत्र येणे म्हणजे दोघांचा फुसका बार आहे. यापुढील निवडणुकीत ते दोघे हरणार आहेत. येणाऱ्या महानगरपालिकेच्या निवडणुकीत महायुतीचा झेंडा फडकेल, असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला आहे.

### पुणे - बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावरील खराब रस्त्याच्या विरोधात शिवसेना ठाकरे गटाचे आंदोलन

**कोल्हापूर /प्रतिनिधी:** पुणे - बेंगलोर महामार्गावर रस्त्यांची दूरावस्था असून सुद्धा टोल वसूली सुरू आहे. त्यामुळे याच्या विरोधात आज शिवसेना ठाकरे गटाकडून कोल्हापूरातील किणी टोल नाक्यावर आंदोलन करण्यात आले. ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख रविकिरण इंगवले यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांनी किणी टोल नाक्यावर जोरदार घोषणाबाजी करत काही काळ टोल वसूली बंद पाडली. यावेळी विना टोल वाहनं सोडण्यात आली. त्यामुळे टोल बंद, वाहतूक सुरू अशी अवस्था किणी टोल नाक्यावर पाहायला मिळाली. महामार्गावरील रस्ते खराब असतील, तर वाहनधारकांकडून टोल वसूली करण्यात येवू नये, अशा सूचना सर्वोच्च न्यायालयाने दिल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर ठाकरे गटाने किणी टोल नाक्यावर मोर्चा काढण्यात आला आहे. त्यानंतर या आंदोलनाची दखल घेत प्रशासनाकडून या महामार्गावरील खड्डे भरण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान जोपर्यंत प्रशासन चांगले रस्ते देत नाही, तोपर्यंत कर वसूली करण्यात येवू नये. अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.

## रासायनिक गुलालांची विक्री, साठवणुक व वापरण्यास बंदी; जिल्हाधिकारी यांचे आदेश

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** आगामी श्री गणेशोत्सव कालावधीत गुलालांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. रासायनिक गुलालाचा वापर केल्याने पर्यावरण व मानवी आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे बुलडाणा जिल्ह्यात रासायनिक गुलालाचे उत्पादन, विक्री, साठवणूक व वापर करण्यास बंदी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमित केले आहे.

गणेशोत्सवात मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या रासायनिक गुलालामुळे पर्यावरण व मानवी आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे. गुलालामध्ये लेड ऑक्साईड, कॉपर सल्फेट, क्रोमियम आयोडाईड, ॲल्युमिनियम ब्रोमाईट यांसारखी घातक रसायने वापरली जातात. यामुळे डोळ्यांना ॲलर्जी, किडनीचे आजार, अस्थायी अंधत्व, ब्रॉन्कीअल अस्थमा, कॅन्सर यांसारखे आजार होण्याचा धोका असून माती, पाणी व हवेत प्रदूषण वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर गणेशोत्सव शांततेत, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखून तसेच पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा व्हावा यासाठी रासायनिक गुलालांची विक्री, साठवणुक व वापर करणाऱ्यांवर पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ नुसार आदेश जारी केले आहेत.

आदेश याप्रमाणे : बुलडाणा जिल्ह्यात रासायनिक गुलालाचे उत्पादन, विक्री, साठवणूक व वापर करणे कायमस्वरूपी बंदी, जिल्ह्यातील सर्व घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांना रासायनिक गुलालाची विक्री व साठवणूक करण्यास सक्त मनाई, पर्यावरणपूरक पर्याय म्हणून नैसर्गिक, हर्बल, जैविक गुलालाचा वापर करावा. बंदीचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापना, दुकाने वा व्यक्तींवर कारवाई करण्याचे अधिकार संबंधित पोलीस प्रशासन व स्थानिक स्वराज्य संस्था यांना प्रदान करण्यात आले असून ते स्वतंत्र्यरित्या कारवाई करतील.

सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ च्या कलम १५ नुसार कारवाई केली जाणार, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# लेंडी कालव्याचे रुंदीकरण, खोलीकर आणि संरक्षक भिंतीची मागणी

## मूव्हमेंट फॉर पीस अँड जस्टिस फॉर वेल्फेअरकडून नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी:** उमरखेड शहरातील वारंवार होणाऱ्या पूरस्थितीमुळे त्रस्त नागरिकांच्या वतीने मूव्हमेंट फॉर पीस अँड जस्टिस फॉर वेल्फ अर या सामाजिक संघटनेने उमरखेड नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देत तातडीच्या उपाययोजनांची मागणी केली आहे. निवेदनात संघटनेने लेंडी कालव्याचे रुंदीकरण व खोलीकरण करून त्यालगत संरक्षक भिंती बांधण्याची आवश्यकता अधोरेखित केली आहे. मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर १५ व १६ ऑगस्ट रोजी झालेल्या पूरपरिस्थितीमुळे फुलारी लेआउट, कोकडवार लेआउट, रहीम नगर, फातिमा कॉलनी आणि मुर्तझा नगर या भागातील नागरिकांना मोठा फटका बसला. पाण्याची पातळी ३ ते ४ फूटांपर्यंत पोहोचल्यामुळे अनेक घरांमध्ये पाणी शिरले, ज्यामुळे जीवित व मालमत्तेचे मोठे नुकसान झाले.

विशेषतः सर्वेक्षण क्रमांक ६३, ६४, ६५, ६५/१ आणि ६६ या मंजूर लेआउटमधील संरक्षक भिंती बांधण्याची अट असूनही संबंधित विकासकांनी ती पूर्ण न केल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

संघटनेने नगरपरिषदेला जबाबदार धरत, या दुर्लक्षाबाबत चौकशी करून संबंधित अधिकारी व विकासकांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. नागरिकांचे नुकसान टाळण्यासाठी व जीवित सुरक्षेसाठी त्वरित स्थळ सर्वे क्षण करून लेंडी कालव्याचे रुंदीकरण, खोलीकरण आणि संरक्षक भिंतीचे काम प्राधान्याने हाती घेण्याची गरज



असल्याचे निवेदनात स्पष्टपणे सांगण्यात आले आहे.

# गणेशोत्सव आणि ईदच्या पार्श्वभूमीवर खामगावात पोलीस रूट मार्च

## एसपी निलेश तांबे यांचे मानाच्या गणपतींचे दर्शन

दैनिक आपला विदर्भ






**बुलढाणा/प्रतिनिधी:** बुलढाणा जिल्ह्यात गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद या दोन मोठ्या सणांच्या पार्श्वभूमीवर कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलीस प्रशासन सतर्क झाले असून, खामगाव शहरात गुरुवारी सायंकाळी भव्य रूट मार्च काढण्यात आला.

या रूट मार्चमध्ये जवळपास ३०० पोलीस अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते. रूट मार्च दरम्यान खामगाव शहरातील प्रमुख मार्ग, तसेच गणेश विसर्जन मिरवणुकीच्या मार्गाची पाहणी करण्यात आली. यामुळे शहरातील नागरिकांमध्ये सुरक्षिततेचा विश्वास निर्माण झाला असून, पोलीस प्रशासन सज्ज असल्याचा संदेश दिला गेला.

रूट मार्च नंतर, जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी खामगाव येथील मानाच्या लाकडी गणपतीचे दर्शन घेतले. हा लाकडी गणपती विसर्जन मिरवणुकीत अग्रभागी असतो आणि स्थानिक पातळीवर त्याला विशेष महत्त्व आहे. दर्शनावेळी गणेश मंडळ व मंदिर प्रशासनाच्या वतीने एसपी निलेश तांबे यांचा सत्कार करण्यात आला.

निलेश तांबे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले, की, ''गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद हे दोन्ही सण एकात्मतेचा संदेश देणारे आहेत. सर्व नागरिकांनी शांतता, सौहार्द आणि सामाजिक सलोखा जपावा. पोलीस प्रशासन आपल्या सुरक्षेसाठी पूर्ण सज्ज असून, कुठलाही अनुचित प्रकार खपवून घेतला जाणार नाही.''

शहरात सध्या उत्सवमय वातावरण असून, सर्व गणेश मंडळे सण साजरा करण्यासाठी जोमात तयारी करत आहेत. अशा वेळी पोलिसांचा रूट मार्च नागरिकांमध्ये सुरक्षिततेचा विश्वास निर्माण करणारा ठरतो आहे.

पोलीस प्रशासन सज्ज असून नागरिकांनी शांतता व सलोखा राखावा, असे आवाहन.

## विविध वृत्त...

### किमान आधारभूत किंमत खरेदी योजनाचा लाभ घेण्यासाठी ई-पिक पाहणी आवश्यक

**बुलढाणा/प्रतिनिधी:** हंगाम २०२५-२६ मध्ये केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार राज्यात नाफेड व  च्या वतीने पणन महासंघामार्फत कडधान्य व तेलबिया पिकांची खरेदी करण्यात येणार आहे. खरेदीसाठी शेतकऱ्यांना ई-पिक पाहणी नोंद असलेला ७/१२ उतारा आवश्यक राहणार आहे.

कडधान्य व तेलबिया पिकांमध्ये मुंग, उडिद, सोयाबीन व तुर या पिकांचा समावेश असून संपूर्ण खरेदी प्रक्रिया पारदर्शक, कार्यक्षम व पूर्णपणे ऑनलाईन प्रणालीद्वारे राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा पणन अधिकारी एम. जी. काकडे यांनी दिली. केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेचा लाभ घेण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांनी शासनाने दिलेल्या कालावधीत आपल्या पिकांची ई-पिक पाहणी पूर्ण करावी. अन्यथा शेतकऱ्यांना खरेदी योजनेत सामील होता येणार नाही, असेही त्यांनी सांगितले.


### ३१ ऑगस्ट पासून बुध्द संडे धम्म स्कूल भंते यश श्रीलंका यांचे उपस्थित मैत्रीय बुध्द विहार बुलडाणा येथे सूरू होत आहे उपासक उपासिकांनी त्यांचा लाभ घ्यावा- धम्मसेवक विजय वाकोडे



**बुलढाणा/प्रतिनिधी:** मातृतीर्थ बुलडाणा जिल्हा फुले ,शाहू ,आंबेडकरांच्या विचार सरणींच्या व धम्मचळवळीच्या बुलडाणा शहरात बुध्द धर्माचे प्रशिक्षण केंद्र व बुध्दरश्मि महाविहार होत आहे ती एक वास्तू बुलडाणा शहराच्या वैभवात भर पडणारी आहे त्या निर्मीतीचे शिल्पकार भंते यश श्रीलंका यांच्या संकल्पनेतून उभे राहणाऱ्या वास्तूला यांच्या धम्मकार्यालाही बौध्द उपासक उपासिकांनी तनमन धनाने मदत ही कारावी.

प्रत्येक विकसित बुध्द राष्ट्रांमध्ये बुद्ध संडे स्कूल चालू आहे त्या धर्तीवर बुलडाणा शहरातही भंते यश श्रीलंका यांचे उपस्थित धम्म उपासक व उपासिका यांना धम्माची माहीती बुध्दाचे तत्वज्ञान प्रत्येक बुध्द उपासकांना माहीती होण्यासाठी भंते यश मार्गदर्शन करणार आहे. त्या करिता सर्व शहरातील श्रध्दावान उपासक उपासिका यांना कळविण्यात अत्यंत हर्ष होत आहे की, प्रत्येक विकसित बुद्ध राष्ट्रातील संडे धम्म स्कुल प्रमाणे बुलढाणा शहरात सुद्धा प्रथमच पूजनीय यश भंतेजी श्रीलंका, यांच्या हस्ते मैत्रेय बुद्ध विहार नागसेन, खामगाव रोड बुलडाणा यांच्या वतीने नवीन दिशा मिळावी या उद्देशाने त्रिशरण,पंचशील,अष्टगाथा, धम्मपद,शील, समाधी, प्रज्ञा, मानवीय मूल्य जीवनातील शुद्ध आचरण, तथागतांच्या मधुर वाणीतील धम्म, तसेच इतर राष्ट्रातील बुध्द विचार, इतिहास, आणि धम्म शिकवणीचे बाल मनावर ''धम्म संस्कार'' व्हावे, यासाठी सात वर्षावरील सर्व बालक, बालिका, महिला, पुरुषांसाठी दिनांक ३१.०८.२०२५ रोजी, सकाळी ९.०० वाजता मैत्रेय बुध्द विहार नागसेनगर सुंदरखेड खामगाव रोड बुलडाणा येथे आयोजन होत आहे, आणि पुढे दर रविवारी सुरू राहणार आहे. यामधे पूज्यनिय यश भंतेजी आणि त्यांचा संघ शिकवण देणार आहेत. सर्वांना आदराची नम्र विनंती की, ३१ ऑगस्ट पासून दर रविवारी आपण व आपल्या पाल्यासह सहपरिवार उपस्थित राहून धम्म ज्ञानाची, दिव्य शिकवण घेऊन आपले जीवन प्रकाशमान करावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते धम्मउपासक उद्दोजक विजय वाकोडे यांनी केले आहे.

# सोशल मीडियावर अफवा पसरवू नका, शेगाव पोलिसांचा कठोर इशारा



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:**सध्या सण-उत्सवांचा काळ सुरु असून, समाजात सौहार्द टिकवणे हे सगळ्यांचं कर्तव्य आहे. मात्र काही अति उत्साही किंवा द्वेषमूलक मानसिकतेचे लोक सोशल मीडियाचा वापर अफवा पसरवण्यासाठी करत आहेत. या पार्श्वभूमीवर शेगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार नितीन पाटील यांनी सोशल मीडिया वापरकर्त्यांना जोरदार इशारा दिला आहे ''कायद्यात राहाल तर फायद्यात राहाल.''

**कायद्यात राहा, अन्यथा गुन्हा होईल**

श्री. पाटील यांनी स्पष्ट सांगितले की, व्हॉट्सअॅप, फेसबुक, इन्स्टाग्राम, युट्युब अशा कोणत्याही सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर जातीय तेढ, धार्मिक भावना भडकावणारी, अथवा समाजात भय पसरवणारी अफवा पसरवणं हा गंभीर कायदेशीर गुन्हा आहे.

त्यामुळे सोशल मीडियावर स्टेटस, पोस्ट, व्हिडीओ किंवा मेसेज शेअर करताना काळजी घेण्याचं आवाहन त्यांनी केलं आहे. जर कोणी अशी चुकीची माहिती पसरवताना आढळून आला, तर सायबर पोलीस, गुप्तचर यंत्रणा, व स्थानिक पोलीस त्यांच्यावर फौजदारी कारवाई करतील.

**सायबर यंत्रणा सक्रिय**

महाराष्ट्र सायबर पोलीस, जिल्हा पोलीस प्रशासन आणि स्थानिक यंत्रणा सोशल मीडियावर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. विशेषतः उत्सवाच्या पार्श्वभूमीवर धर्म, जात, समाज यांच्या नावावर द्वेष पसरवणाऱ्या मजकुरांवर तातडीने कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

**सामाजिक जबाबदारी जपा**

ठाणेदार पाटील म्हणाले, ''सण-उत्सव शांततेत आणि सौहार्दात पार पडावेत, यासाठी प्रत्येक नागरिकाने सामाजिक जबाबदारीने वागणं आवश्यक आहे. सोशल मीडियावर काही पोस्ट करताना त्याचे परिणाम काय होऊ शकतात, हे लक्षात घ्या.''

**थोडक्यात सूचना:**

अफवा, द्वेषयुक्त किंवा भडकावणारे पोस्ट टाळा.

सोशल मीडियावर माहिती शेअर करताना खात्री करा.

कायदाचं उल्लंघन करणाऱ्यांवर फौजदारी कारवाई होणार.

समाजात शांतता आणि एकोपा राखणं ही सगळ्यांची जबाबदारी आहे.

# शेतात काम करताना विद्युत तारेचा धक्का बसून महिलेचा मृत्यू; पतीचा थोडक्यात बचाव

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

बिबी : सिंदखेडराजा तालुक्यातील जऊळका येथील मंगलबाई रंगनाथ सांगळे (वय ५७) या शेतकरी महिलेचा आज (दि. २८ ऑगस्ट) शेतातील विजेच्या धक्क्याने जागीच मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे.

आज सकाळी मंगलबाई सांगळे व त्यांचे पती रंगनाथ सांगळे शेतात सोयाबीन निंदण्यासाठी गेले होते. दुपारी ४ वाजता निंदणी करत असताना शेतातील वीज खांबाच्या तारेस हात लागल्याने मंगलबाईंना जोरदार करंट बसला. काल पडलेल्या पावसामुळे जमीन ओलसर होती, त्यामुळे करंटचा तीव्रतेने प्रसार होऊन त्या जागीच मृत्यूमुखी पडल्या.



घटनेची माहिती मिळताच गावातील नागरिकांसह कि. राजा पोलीस ठाण्याचे दुय्यम ठाणेदार मोहन गिते व पोलीस कर्मचारी गणेश वारकरी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय, सिंदखेडराजा येथे पाठवला.

मंगलबाई सांगळे यांच्या पश्चात पती, एक मुलगा आणि दोन मुली असा परिवार आहे. बातमी लिहीपर्यंत संबंधित प्रकरणी गुन्हा दाखल झाला नव्हता.

पतीने वाचवण्याचा केला प्रयत्न पत्नीला विजेचा धक्का बसलेला पाहताच रंगनाथ सांगळे यांनी तिला वाचवण्यासाठी छत्रीच्या हुकाच्या साहाय्याने तार दूर करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांनाही करंट बसला. सुदैवाने छत्रीचा हुक निसटल्याने ते दूर फेकले गेले आणि त्यांचा जीव थोडक्यात वाचला.

# आर्थिक साक्षरतेसाठी मेहकर येथे आर्थिक समावेशन कार्यक्रम; रि-केवायसी, विमा व योजनांवर तज्ज्ञांव्दारे मार्गदर्शन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये आर्थिक साक्षरता वाढविण्यासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने वेदिका लॉन, मेहकर येथे ग्रामपंचायत स्तर आर्थिक समावेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय), सेंट्रल बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक ऑफ इंडिया तसेच विविध वित्तीय संस्थांचे वरिष्ठ अधिकारी, स्थानिक प्रशासन व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी तज्ज्ञांव्दारे रि-केवायसी, विमा व शासनाच्या विविध योजनावर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आरबीआय नागपूर उप महाव्यवस्थापक अंजना शामनाथ यांनी भूषविले. तर सेंट्रल बँक ऑफ इंडिया, पुणेचे अंचालिक प्रबंधक अजय कुमार सिंग प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी सेंट्रल बँक ऑफ इंडिया अकोला क्षेत्रीय प्रमुख पंकज कुमार, स्टेट बँक ऑफ इंडिया, बुलढाणा क्षेत्रीय प्रमुख नीरज कुमार, आयसीआयसीआय बँक अंचालिक प्रबंधक विवेक बल्की, उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, जिल्हा उद्योग केंद्र महाव्यवस्थापक प्रमोद लांडे, नाबार्ड रोहित गडे, अग्रणी जिल्हा प्रबंधक कौशलेन्द्र कुमार सिंग आदी उपस्थित होते.

अंजना शामनाथ यांनी रि-केवायसीचे महत्त्व अधोरेखित करत प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (पी.एम.जे.जे.बी.वाय), प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना (पी.एम.एस.बी.वाय) आणि अटल पेन्शन योजना (ए.पी.वाय) याबाबत सविस्तर माहिती दिली. डिजिटल बँकिंगमधील सायबर सुरक्षा व सुरक्षित व्यवहारांवरही त्यांनी मार्गदर्शन केले.

अजय कुमार सिंग यांनी सांगितले की, सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही प्रधानमंत्री जनधन योजना (पी.एम.जे.डी.वाय) व अन्य योजनांच्या अंमलबजावणीत आघाडीवर असून, ग्रामीण भागात जागरूकता व नोंदणीसाठी प्रयत्नशील आहे. पंकज कुमार यांनी आर्थिक समावेशन ग्रामीण विकासाचे बळ असल्याचे नमूद केले, तर कौशलेन्द्र कुमार सिंग (एलडीएम बुलढाणा) यांनी बँकांच्या संयुक्त उपक्रमाचे कौतुक करत जिल्ह्यातील नागरिकांना थकीत रि-केवायसी पूर्ण करण्याचे आवाहन केले.

या उपक्रमाअंतर्गत १९ ऑगस्ट रोजी ९ हजार ९८७ रि-केवायसी तर २० ऑगस्ट रोजी ८ हजार ५६९ रि-केवायसी पूर्ण झाल्याची मोठी उपलब्धी नमूद करण्यात आली. कार्यक्रमादरम्यान विविध शासकीय योजनांअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना धनादेशांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

मेहकर व परिसरातील नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला. आर्थिक साक्षरता व समावेशनाच्या दिशेने ग्रामीण भागासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

# संत नगरी शेगावात ऋषिपंचमीनिमित्त भाविकांची प्रचंड गर्दी

दैनिक आपला विदर्भ


■ देवानंद सानप

**लोणार :** ऋषिपंचमीच्या पवित्र दिनी संपूर्ण महाराष्ट्रातून आणि राज्याबाहेरून आलेल्या हजारो भाविकांनी श्री संत गजानन महाराजांच्या ११५ व्या पुण्यतिथी निमित्ताने विदर्भाची पंढरी शेगाव नगरी गजबजून गेली आहे. भक्तिभावाने ओतप्रोत झालेल्या या वातावरणात, शेगावात पुण्यतिथी सप्ताहाचे औचित्य साधून सुमारे ४०० हून अधिक दिंड्या दाखल झाल्या आहेत.

**भाविकांचा प्रचंड उत्साह, संत नगरीत भक्तीमय वातावरण**


शेगाव शहरातील श्री गजानन महाराज मंदिर परिसर, त्याचे सर्व प्रवेशद्वारे आणि सभोवतालची रस्ते आंब्याची तोरणे, केळीची

**श्री संत गजानन महाराजांच्या ११५ व्या पुण्यतिथीनिमित्त राज्यभरातून आलेल्या दिंड्यांची मांदियाळी**




पाने व रंगीबेरंगी फुलांनी सजवले गेले असून, मंदिरात सकाळी चार





वाजल्यापासूनच दर्शनासाठी लांबच लांब रांगा लागलेल्याचे दृश्य पाहायला मिळाले.

''गण गण गणात बोते'', ''ज्ञानोबा-तुकाराम'', ''विठ्ठल विठ्ठल'' अशा जयघोषांनी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हालेला आहे. स्थानिक भाविकांसह, विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि मध्य प्रदेशातून आलेल्या दिंड्या व भजनी मंडळांनी संपूर्ण नगरीला भक्तीच्या वातावरणाने भारून टाकले आहे.

**संस्थेच्या वतीने उत्कृष्ट व्यवस्था**

श्री गजानन महाराज संस्थान तर्फे दर्शनासाठी आलेल्या भाविकांसाठी सुसज्ज व्यवस्था करण्यात आली आहे.

शेकडो सेवेकरी सेवेसाठी सज्ज आहेत. दर्शनासाठी विशेष मार्गदर्शक फलक, पाणी व्यवस्था, निवास व भोजन व्यवस्थाही करण्यात आली आहे.

दिंड्यांसाठी विशेष विश्रांतीस्थाने आणि वाहनतळांचीही सोय करण्यात आली आहे.

**आकर्षक सजावट आणि भक्तिमय कार्यक्रम**

मंदिर परिसरातील सजावट भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे. तसेच, पुण्यतिथीनिमित्त सप्ताहभर कीर्तन, प्रवचन, भजन यांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० वाजेपर्यंतच सुमारे ३७५-४०० दिंड्यांची नोंद झाली असून, दिवसात ही संख्या आणखी वाढण्याची शक्यता होती.